महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासनअंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्सक्रमांक : ०२२ - २४०२५७६३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासं/रवका//न.क्र.०५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र.६५८ दि.२५/०५/२०२३

**विषय : म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना देय असलेल्या 'रेनसूट व गमबूटच्या' खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या दरामध्ये वाढ करण्याबाबत.**

**संदर्भ :** १) संहिताबद्ध स.सा.आ.क्र. ०१ दि. ३१.१०.१९७२.
२) परिपत्रक क्र.साप्रवि/सामान्य/१७२० दि.१०.०६.१९९९.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२ दि. १५.०७.२००६.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.१२९ दि.०२.११.२००७.
५) प्रशासकीय परिपत्रक क्र.५६० दि.१३.०७.२०१७.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ संहिताबद्ध स.सा.आ.क्र.०१ दि.३१.१०.१९७२ अनुसार संचलन व सुव्यवस्था मंडलांतर्गत कार्यरत असणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना पावसाळयामध्ये कार्यालयाबाहेर काम करणे सुलभ व्हावे या दृष्टिकोनातून 'रेनसूट' व 'गमबुट' पुरविण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीमध्ये कालांतरानुसार कामाचे स्वरूप विचारात घेता वेळोवेळी बदल करण्यात आला असुन संदर्भीय क्र.०३ अन्वये सर्व तारमार्ग कर्मचाऱ्यांसाठी 'रेनकोट' ऐवजी 'रेनसूट' पुरविण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. महावितरण कंपनीमधील 'रेनसूट' व 'गमबुट' मिळण्यास पात्र कर्मचाऱ्यांना खर्चाची प्रतिपूर्ती ही स.सा.आ.क्र.१ दि.३१.१०.१९७२ मधील तरतूदीनुसार दोन वर्षातून एकदा करण्यात येते. सदर प्रतिपूर्तीचे दर संदर्भ क्र.०४ अनुसार सध्याचे गमबूटाचे कमाल दर रु.३५०/- इतके व रेनसूटचे दर रु.५५०/- व संदर्भीय क्र.०५ व त्याचे शुध्दीपत्रक क्र.१७२२० दि.१४.०७.२०१७ नुसार रेनसुट करिता रु.८००/- असा सुधारित दर करण्यात आलेला आहे.

३. महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना पावसाळ्यामध्ये काम करताना सुलभता व सुरक्षितता असावी या दृष्टीने कंपनीतील तांत्रिक कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या 'रेनसूट' व 'गमबुट' या साहित्याकरिता देण्यात येणाऱ्या खर्चाच्या प्रतिपूर्तीमध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव कंपनी प्रशासनाच्या विचारधीन होता. त्यानुसार मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), संचालक (वित्त), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) व संचालक (मासं) यांच्याशी विचार विनिमय करून 'रेनसूट' व 'गमबुट' खरेदीसाठी देय असलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्ती मध्ये पुढीलप्रमाणे वाढ करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | सध्याचे दर (रुपये) (२ वर्षातून एकदा) | सुधारित वाढीव दर (रुपये) (२ वर्षातून एकदा) |
|---|---|---|---|
| १ | रेनसूट | ८००/- | १२००/- |
| २ | गमबूट | ३५०/- | ७००/- |

* **वाढीव प्रतिपूर्तीचा निश्चित करण्यात आलेला दर किंवा प्रत्यक्ष खरेदी केलेली रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल त्या दराने करण्यात यावी.**

४. 'रेनसूट' व 'गमबुट' हे २ (दोन) वर्षाच्या प्रत्येक गटवर्षाकरिता द्यावयाच्या असून चालू गटवर्ष २०२२-२०२४ असे धरले जावे.

५. सदर खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याकरिता कर्मचाऱ्याने खरेदी केलेले 'रेनसूट' व 'गमबुट' चे देयक (बिल) हे वस्तु व सेवा कर (GST) सह सादर करणे बंधनकारक राहील. तसेच देयके मंजूर केल्यानंतर कर्मचाऱ्याला त्यांची प्रतिपूर्ती एक माहिन्याच्या आत करण्यात येईल.

६. 'रेनसूट' व 'गमबुट' मिळण्यास पात्रतेबाबत व प्रतिपूर्तीच्या कार्यपध्दतीबाबत यापुर्वी निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भीय क्र.०२, ०४ व ०५ मधील इतर सूचना अबाधित राहतील.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) / मुख्य तपास अधिकारी / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) मुख्य अभियंता, (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.